# अनुदानात कपात केल्याने महाविद्यालये आर्थिक संकटात

**क्रांतिकुमार पाटील यांचे प्रतिपादन**

**कोल्हापूर, ता. २८ :** महाविद्यालयांना मिळणाऱ्या अनुदानामध्ये शासनाने कपात केल्याने सर्व महाविद्यालये आर्थिक संकटात सापडली आहेत. मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी राज्यातील सर्व प्राचार्य दोन फेब्रुवारीला काळ्या फिती लावून काम बंद आंदोलन करणार आहेत. शासनाने दखल न घेतल्यास जूनमध्ये महाविद्यालये उघडली जाणार नाहीत, असा इशारा काल महाराष्ट्र प्राचार्य महासंघाचे सरचिटणीस प्राचार्य क्रांतिकुमार पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिला.

यावेळी देण्यात आलेली माहिती अशी : प्राचार्य महासंघाचे १८ वे अधिवेशन औरंगाबाद येथे झाले. या अधिवेशनात प्राचार्य महासंघाने संस्थाचालक, शिक्षक, विद्यार्थी यांच्यादृष्टीने भेडसावणाऱ्या विविध अडचणी १६५ ठरावाद्वारे महाराष्ट्र शासनापुढे मागण्यांच्या स्वरुपात मांडल्या होत्या. या मागण्यांपैकी काही मागण्या महाराष्ट्र शासनाने यापूर्वीच प्राचार्य महासंघाशी झालेल्या चर्चेमध्ये तत्त्वतः मान्यही केल्या आहेत, परंतु त्याची कार्यवाही झालेली नाही. गेल्या काही वर्षांपासून महाराष्ट्र शासनाने अंगिकारलेल्या अनुदान निर्धारण पद्धतीमुळे महाविद्यालयांना प्रचंड आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. अनुदान निर्धारणाच्या वेळी प्रो-रेटाचे कारण दाखवून महाविद्यालयांना मिळणाऱ्या अनुदानामध्ये शासनाने मोठ्या प्रमाणात कपात सुरू केलेली आहे. याचा फटका सर्वच महाविद्यालयांना बसला असून प्रत्येक महाविद्यालयास गेली पाच वर्षे काही लाख रुपयांची अनुदान कपात सहन करावी लागत आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील सर्वच महाविद्यालये आर्थिक अडचणीत आली आहेत.

शासनाच्या तुकडी व विषयाच्या विद्यार्थी संख्येबाबतच्या नव्याने टाकलेल्या जाचक अटींमुळे अनेक महाविद्यालयांमधून तुकड्या व विषय बंद पडू लागले आहेत. याच धोरणाचा परिणाम म्हणून अनेक महाविद्यालयांतून काम नसल्याने अनेक वर्षे सेवेत असणारे प्राध्यापक अतिरिक्त होत आहेत.

अनावश्यक ठिकाणी नव्या महाविद्यालयांना परवानगी देऊ नये, १९९४ च्या महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यात बदल करावा, महिलांसाठी संपूर्ण मोफत शिक्षण द्यावे यांसारख्या दहा प्रमुख मागण्यांबाबत प्राचार्य महासंघ आग्रही आहे. अधिवेशनात संमत करण्यात आलेल्या ठरावात बारा ठराव शासनाच्या धोरणात्मक बाबींशी, सात ठराव प्रशासकीय बाबींशी, नऊ कायदेविषयक, १४ नेमणुकीविषयी, ४५ अनुदानविषयक, ३१ तुकडीविषयक, आठ ठराव शुल्क आकारणीसंबंधी, २७ किमान कौशल्यावर आधारित व द्विलक्षी अभ्यासक्रमासंबंधी आहेत.

यावेळी प्राचार्य आर. डी. गायकवाड, डी. आर. मोरे, आबासाहेब शिंदे, सी. आर. गोडसे, डी. के. पाटील, एस. टी. जाधव, शंकरराव निकम, नलावडे व राजगे उपस्थित होते.

# प्रश्न न सोडविल्यास सोमवारी महाविद्यालये बंद

***कोल्हापूर, दि. २८ (प्रतिनिधी)***
शासनाच्या नव्या धोरणामुळे महाविद्यालये आर्थिक अडचणीत आली असून महाविद्यालयाचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न न केल्यास प्राचार्य महासंघातर्फे २ फेब्रुवारी रोजी 'महाविद्यालय बंद' ठेवण्यात येतील अशी माहिती शिवाजी विद्यापीठ प्राचार्य संघटनेचे अध्यक्ष डॉ. आर. डी. गायकवाड यांनी आज पत्रकार बैठकीत दिली.

डॉ. गायकवाड यांनी सांगितले की, महासंघाच्या अनेक मागण्यो शासनाने तत्वता मान्य केल्या होत्या. परंतु त्याची कार्यवाही झालेली नाही. मागील काही वर्षापासून शासनाने अंगीकारलेल्या अनुदान निर्धारण पद्धतीमुळे महाविद्यालयांना प्रचंड आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. अनुदानामध्ये कपात केल्याने महाविद्यालये अडचणीत आली आहेत.

तुकडी व विषयाच्या विद्यार्थी संख्येबाबत नव्याने टाकलेल्या जाचक अटींमुळे अनेक महाविद्यालयांमधून तुकड्या व विषय बंद पडू लागले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधीपासून वंचित रहावे लागणार आहे. प्राध्यापकही अतिरिक्त ठरत आहेत.

महासंघाच्या मागण्याबाबत उपमुख्यमंत्री गोपिनाथ मुंडे, शिक्षण मंत्री दत्ताजी राणे यांची भेट घेतली. त्यांच्याकडून फारसा प्रतिसाद मिळाला नाही. महासंघाचे प्रश्न सोडविण्यासाठी लेखी करार न केल्यास २ फेब्रुवारी रोजी महाविद्यालये बंद ठेवण्यात येतील.

यावेळी एस. पी. जाधव, क्रांतीकुमार पाटील, सी. आर. गोडसे, आबासाहेब शिंदे, शंकरराव निकम, डी. के. पाटील, डी. आर. मोरे, श्री. नलवडे, श्री. राजगे आदी उपस्थित होते.